बुधवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२६

# बीड मध्ये सामान्य चहा विक्रेत्याला मारहाण करणाऱ्यावर अखेर गुन्हा दाखल; एमआयएम आणि एसडीपीआयच्या पाठपुराव्याला यश

**बीड । किसान न्युज**

शहरातील कालिका नगर भागात एका चहा विक्रेत्याला विनाकारण मारहाण करून त्याचे नुकसान करणाऱ्या जालिंदर सानप याच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एमआयएम (MIM) आणि एसडीपीआय (SDPI) या पक्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

सविस्तर वृत्त: तक्रारदार अकबर रहीम शेख हे चहाचा स्टॉल चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. ९ मार्च २०२६ रोजी रात्री आरोपी जालिंदर सानप याने शेख यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिला असता, आरोपीने त्यांना शिवीगाळ करत मारहाण केली आणि चहाच्या स्टॉलचे मोठे नुकसान केले. याप्रकरणी एमआयएमचे बीड जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ आणि एसडीपीआयचे जिल्हाध्यक्ष सैयद आबेद अब्बास यांच्या मार्गदर्शनाखाली इम्रान शिकलगार व एसडीपीआयच्या शेख अब्दुल कादर व अन्य कार्यकर्त्यांनी सातत्याने पोलीस प्रशासनाकडे धाव घेतली होती. अखेर ३१ मार्च रोजी शिवाजीनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५१(३) आणि ३२४(४) अन्वये गुन्हा (F.I.R. No. ००७२/२०२६) नोंदवला आहे. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र राख अधिक तपास करत आहेत. आता आरोपीला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी आग्रही मागणी पोलीस प्रशासनाकडे करण्यात आली आहे. पीडिताला न्याय मिळवून देण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल पोलीस प्रशासनाचेही आभार मानले जात आहेत.

# किल्लेधारुर शहरातील चौकाचौकात सी. सी. टीव्ही कॅमेरे बसवावेत तसेच गतिरोधक टाकून घ्यावेत : संदीप शिनगारे

**किल्लेधारूर । किसान न्युज**



किल्लेधारूर शहरात सुरक्षेच्या दृष्टीने चौकाचौकात सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवून घ्यावेत. सदरील सीसीटीव्ही उच्च दर्जाचे व कायम स्वरुपी असावेत.यामुळे शहरातील चोर्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.तसेच शहरातून खामगाव-पंढरपूर महामार्ग गेल्याने वाहतूक प्रचंड वाढली असून भरधाव वाहनामुळे अनेक अपघात होउन कित्येक जणांना आपला जिव गमवावा लागला आहे. वेग नियंत्रीत ठेवण्यासाठी घाटपाटी ते चिंचपूर रोड पर्यंत तसेच आडस रोडला धारूर ते श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल या मार्गावर योग्य ठिकाणी गतिरोधक बसवणे आवश्यक आहेत. शहरात नवीन रस्ता बसस्थानक ते काशिनाथ चौक ते हनुमान मंदिर कसबा विभाग यावर गतिरोधक बसवण्यात यावेत अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितिचे संचालक तथा प्रतिष्ठित व्यापारी संदीप भैय्या शिनगारे यांनी जाहीर प्रसिद्धी पत्रकातून प्रशासनाला केली आहे.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २११/२०२६**
**कौशल्याबाई भ्र.त्रिंबक चोरमले व इतर वि. निरंक**
**( मार्फत – ॲड. आर,एच.राठोड गेवराई)**

अर्जदार –१. कौशल्याबाई भ्र.त्रिंबक चोरमले, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. रेवकी ता.गेवराई जि.बीड.
२. अशोक पि.त्रिंबक चोरमले, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा.रेवकी ता. गेवराई जि. बीड. ह.मु.डोईफोडवाडी ता. गेवराई जि. बीड.
३. रत्नमाला भ्र.भारत यमगर, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा.रेवकी ता.गेवराई जि. बीड.
४. सुरेखाबाई भ्र.भास्कर कोकरे, वय ५१ वर्षे, धंदा शेती, रा.आगरनांदुर ता. गेवराई जि.बीड.
५. अंजना भ्र.अंकुश राऊत, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा.घोंसी खुर्द ता. घनसावंगी जि. जालना.
६. मिरा भ्र.भगवान देवकते, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा.देकनमोहा ता.जि. बीड.

ज्याअर्थी मयत त्रिंबक गुजाबा चोरमले, रा. रेवकी ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक १६/०१/२०२४ रोजी रा. मौजे रेवकी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार क. १ ते ६ यांनी

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे त्रिंबक गुजाबा चोरमले, रा.रेवकी ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/०३/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख ०८/०५/२०२६.

क.लिपीक — कोर्टाचा शिक्का — आदेशावरुन सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २१५/२०२६**
**विठ्ठलराव पि.भिवराव मचे वि.निरंक**
**(मार्फत – ॲड.पी.बी.मचे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे सरस्वती भ्र.विठ्ठलराव मचे, रा.खामगाव ता.गेवराई जि.बीड हे/हया दिनांक १७/०८/२०२५ रोजी खामगाव ता.गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र. १. विठ्ठलराव पि. भिवराव मचे, वय ८० वर्षे, धंदा शेती, रा. खामगाव ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ किरण पि. विठ्ठलराव मचे, वय २८ वर्षे, धंदा शेती रा. खामगाव ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ अर्चना भ्र. विजय सरकटे, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. तळणी ता. मंठा जि. जालना, अर्जदार क्र. ४ सुवर्णा भ्र. मदन जाधव, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. बोरगाव बु. ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे सरस्वती भ्र.विठ्ठलराव मचे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०८/०५/२०२६.

क.लिपीक — कोर्टाचा शिक्का — आदेशावरुन सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

## टि.सी. हरवला आहे

**पठाण सना बेगम हफीज खान** या नावाचा इयत्ता ९ वी पासचा टी.सी. अंबाजोगाई ते बीड बस प्रवासा दरम्यान हरवला आहे, कोणाला सापडल्यास खालील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा

**:: संपर्क ::** मो.९२८४३७७४८७

## महत्त्वाचे कागदपत्रे हरवला आहे

**मोमीन नाजेम समियोद्दीन** या नावाचा इयत्ता १२ वी पासचा टी.सी.,सनद, आणि मार्क मेमो व इतर काही महत्त्वाचे कागदपत्रे केज येथील समता नगर ते वसंत महाविद्यालय दरम्यान हरवले आहे, कोणाला सापडल्यास खालील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा

**:: संपर्क :: मो.**८४८३८६८७०८

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २०८/२०२६**
**कैलास पि. दामोधर इंदे व इतर वि. निरंक**
**( मार्फत – ॲड. ए.बी.सवासे, गेवराई)**

अर्जदार – १. कैलास पि.दामोधर इंदे, वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा.गजानन नगर रहाटनी पुणे. ह.मु.उमापुर ता.गेवराई जि.बीड.
२. विलास पि.दामोधर इंदे, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा.सदर.
३. कृष्णा पि.दामु उर्फ दामोधर इंदे, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा.उमापुर ता.गेवराई जि.बीड.

ज्याअर्थी मयत १. दामोधर लक्ष्मण इंदे व २. लताबाई दामु उर्फ दामोधर इंदे, दोघे रा.उमापुर ता.गेवराई जि.बीड हे अनुक्रमे दिनांक ०७/०४/२०१९ व दिनांक २२/१०/२०२५ रोजी अनुक्रमे रा.उमापुर ता.गेवराई जि.बीड व मौजे डी. वाय.पाटील, हॉस्पीटल पिंपरी चिंचवड पुणे येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे १.दामोधर लक्ष्मण इंदे व २.लताबाई दामु उर्फ दामोधर इंदे, दोघे रा.उमापुर ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/०३/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०६/०५/२०२६.

क.लिपीक — कोर्टाचा शिक्का — आदेशावरुन सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

पान १ वरून...

### गुंड यांच्या आंदोलनाला...

संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून आज बुधवारी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले. तसेच जर प्रशासनाने मोहन गुंड यांच्या आंदोलनाची दखल घेऊन सर्व मागण्या मान्य केल्या नाही तर कोणत्याही क्षणी केज शहर बंद करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. या आंदोलनात हनुमंत भोसले, गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली अनेकजण सहभागी झाले होते.

### गायरान जमिनीसाठी राज्यात...

लवकरच राज्यामध्ये गायरान जमिनीचा लढा उभा करणार असल्याची घोषणा पप्पू कागदे यांनी केली. तसेच अनेक वर्षा भूमिहीन कास्तकार कसत असलेल्या अतिक्रमित गायरान जमिनी त्यांच्या नावावर करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून मागणी करण्यात येणार आहे. कागदे यांनी कार्यकर्त्यांनी शासकीय योजनांचा लाभ गरजूंना मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहून स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खुल्या पत्रावर आधारित रिपब्लिकन पार्टी पार्टीचे विचार तळागाळात रुजवून सर्व जाती धर्मांच्या कार्यकर्त्यांना सामावून घेऊ पक्ष तळागाळा पर्यंत रुजविण्याचे कार्यकर्त्यांना आदेश दिले. प्रमुख पाहुणे राजू जोगदंड, दिलीप जोशी, दीपक कांबळे, दशरथ शिंदे, राणी गायकवाड यांनीही पक्ष संघटन आणि सामाजिक चळवळ या बाबत मार्गदर्शन केले. मेळाव्याला राहुल गंडले, विलास वाघमारे, मधुकर कसबे, कोमल मस्के, करण साळवे, मा. मा. यशवंत पट्टेकर, राहुल जोगदंड, गणेश कसबे, किरण खंडागळे यांच्यासह उमेश बचाटे, भाऊ कोरडे, शिलालाई नागेश मस्के, निताताई राजेभाऊ गायकवाड, शितलताई शुक्राचार्य गायकवाड, कांताबाई दगडू गायकवाड, शोभाताई बनसोडे, सिंधुताई वाघमारे, शांताताई कांळुंके, सुरेखाताई इंगळे, मधुर वासुद, विकास सुरवसे, सुरेश कांबळे, गणेश टेकरले, सोमेश्वर गंडले, विलास भागवत, सागर ओगले, विकास जोगदंड, भाऊराव होके, मनिष आदमाने, संकेत गोरे, विनोद आदमाने, महादेव पोटभरे, प्रभाकर आदमाने, प्रशांत भालेराव, विश्वास जोगदंड, तात्याराव जोगदंड, गोविंद टेकाळे, शेषेराव काशिकर, महादेव काशिकर, दयानंद भालेराव, महेंद्र गंडले, गोविंद टेकाळे, जनार्दन ओठले, हरिभाऊ ओठले, सुरज गव्हाणे, अमोल जोगदंड, राजेभाऊ भागवत, संतराम सुरवसे, नंदु भागवत, आण्णा भागवत, तथागत मस्के, मिलिंद वाघमारे, चंदु वाघमारे, राजेभाऊ मस्के, कुमार जोगदंड, संदिपान गायकवाड, मोहन क्षीरसागर, अशोक वाघमारे, ईश्वर मस्के, विजय इंगळे, अंबादास पोटभरे, विजय पोटभरे, बलभिम हजारे, कालिदास हजारे, इश्वर पोटभरे, युवराज कांबळे, बंड कांबळे, विक्रम ओटले, चेतन कांबळे, आकाश भालेराव, राजरल भालेराव, बाळासाहेब भालेराव, अतुल जोगदंड, समाधान जोगदंड, शुष्टधन जोगदंड, अशोक कांबळे, प्रकाश खरात, वैजनाथ ओठले, लखन होके, प्रशांत होके, शिवचरण सातपुते, किशोर सुरवसे यांच्यासह तालुक्यातील कार्यकर्ते आणि गायरानधारक मोठ्या संख्येने हजर होते.

### बनावट कागदपत्रांवर...

दिले आहेत. कोणतीही शंका आढळल्यास तत्काळ वरिष्ठांना कळवण्यास सांगण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या या निर्देशांमुळे पासपोर्ट प्रक्रियेत पारदर्शकता वाढून बनावट कागदपत्रांवर आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पान ४ वरून...

### अमरसिंह पंडित ...

न्यायालयाने दिलेली मुदत पूर्ण होण्यापूर्वी स्टेट बँक ऑफ इंडियाच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात आले. अमरसिंह पंडित यांनी ड.दिलीप तौर यांच्या माध्यमातून शेतकऱ्याची बाजू सर्वोच्च न्यायालयात खंबीरपणे मांडली, सर्वोच्च न्यायालयाने बँक आणि विमा कंपनी यांची याचिका फेटाळून लावली. दरम्यान बँकेने पुन्हा उच्च न्यायालयात पुर्नेनिरीक्षण याचिका दाखल करून वेळकाढूपणा केला. अमरसिंह पंडित यांनी शेवटी उच्च न्यायालयात बँकेविरोधात अवमान याचिका दाखल केली. या प्रकरणात सुनावणी सुरु असताना पिक विमा कंपनीने विमा हप्त्याची रक्कम व्याजासह बँकेला अदा केली आणि मंगळवार, दि.३१ मार्च रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या उमापूर शाखेने या प्रकरणातील १५६ शेतकऱ्यांना ७ टक्के व्याजासह पिक विमा नुकसान भरपाई पोटी ७२ लाख ९४ हजार ४९९ रुपये वाटप केले आहे. शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाईची रक्कम जमा झाल्याचा मेसेज प्राप्त झाल्यानंतर शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त करत अमरसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत. सिनिअर काऊन्सिल ॲड.नंदकुमार खंदारे आणि ॲड.विलास सावंत यांनी उच्च न्यायालयात बाजू मांडली आहे.

### अमृत पाणी पुरवठा ...

विशेष सभेचे आयोजन केले. या सभेत अनेक पालिका सदस्यांनी वस्तुस्थिती मांडून बीड शहराच्या पाणीपुरवठा योजनेची कशी विल्हेवाट लावली ? याचा पाढाच सभागृहात मांडला. माजलगाव डॅमपासून जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाण्याची आवक ७ एमएलडी ने कमी असणे, अनेक कामे अपूर्ण ठेवणे, वितरण नलिकेचे काम अपूर्ण असणे, दोन जलकुंभ बंद असणे, निकृष्ट दर्जाची कामे करणे, पाईप न आंथरता ते काम केल्याचे कागदोपत्री दाखविणे, चुकीचे सर्व्हेक्षण करणे, तांत्रिक चाचणी न घेता १०० टक्के देयके अदा करणे आदी गंभीर स्वरुपाच्या बाबी लक्षात आल्यामुळे ही योजना हस्तांतरीत करून घेण्यास पालिका प्रशासनाने स्पष्ट शब्दांत विरोध केला आहे. या बाबत पाणीपुरवठा सभापती तथा उपाध्यक्ष विनोद मुळूक यांनी माहिती देताना सांगितले की, अमृत पाणीपुरवठा योजना ही बीड शहरातील नागरीकांसाठी अतिशय महत्वाकांक्षी योजना आहे. मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अख्त्यारीत ही योजना गेल्यामुळे संपुर्ण योजनेचा बोजवारा उडाला. कंत्राटदाराने संबंधितांशी आर्थिक संगणमत करून कोट्यावधी रुपयांची उचल करून पोबारा केला आहे, कंत्राटदार पालिकेच्या आणि जिल्हा प्रशासनाच्या कोणत्याही बैठकांना उपस्थित राहत नाही. जीवन प्राधिकरणाने योजनेची चाचणी करून दिल्याशिवाय आम्ही त्याचे हस्तांतरण होऊ देणार नाहीत असा ठराव आजच्या विशेष सभेत आम्ही घेतला आहे. विशेष सभेच्या अनुषंगाने आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. श्रीमती सुनेत्रावहिणी अजितदादा पवार यांच्याकडे हा विषय आम्ही घेऊन जाणार आहोत. शहराला सुरळीत आणि स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी भविष्यात आमचे प्रयत्न असून त्यासाठी कटिबध्द असल्याचे उपाध्यक्ष विनोद मुळूक यांनी सांगितले.

### गेवराईच्या भाजपा ...

जि.प. सभापती युधाजित दादा पंडित यांनी उपस्थित पदाधिकारी कार्यकर्ते बूथ प्रमुखांना मार्गदर्शन करताना संघटन बळकटी, मतदारांशी संवाद आणि आगामी निवडणुकांच्या दृष्टीने प्रभावी नियोजन यावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी युवानेते रोहित भैय्या पंडित, युवानेते यशराज भैय्या पंडित, शिवराज दादा पवार, गेवराई ता. समन्वयक श्रीकांत सानप,. श्री. संजय कोडगे (प्रदेश उपाध्यक्ष), मा. श्री. पी. टी. चव्हाण मा. जि. प. सदस्य, श्री.मनोज काका पाटील मा. जि. प. सदस्य मा. श्री.बाळासाहेब सानप, यांच्यासह भारतीय जनता पार्टी चे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### माळापुरी–कुर्ला ...

कुक्कडगाव तसेच पंचक्रोशीतील नागरिकांच्या वाहतुकीच्या अडचणी मोठ्या प्रमाणात दूर होणार आहेत. दरम्यान, सुरू असलेले काम दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा श्री. तुषार पाटील यांनी व्यक्त केली आहे. तसेच संबंधित विभागाने कामावर योग्य देखरेख ठेवून नागरिकांना टिकाऊ व दर्जेदार रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### जि.प.मधील सेवानिवृत्त ...

सर्व जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे ही आर्थिक लाभा बाबत यश मिळाले. आणि कास्ट्राईबच्या प्रयत्नामुळे बीड सह महाराष्ट्र राज्यातील सेवानिवृत्त शिक्षकांचा प्रश्न मार्गी लागला. या कामी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.जितीन रहेमान, वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ, शिक्षणाधिकारी (प्रा) किरण कुवर मॅडम, कोषागार अधिकारी गळगुंडे , उपकोषागार अधिकारी बाब्रस, वायकर, मोरे तसेच वित्त विभागातील कर्मचारी गायकवाड,फुंदे, ढाकणे, शिक्षण विभाग प्राथमिक मधील गायकवाड, प्रकाश तुरुकमारे यांनी मोलाचे सहकार्य करुन दि.३०/०३/२०२६ रोजी बजेट तालुका स्तरावर गटविकास अधिकारी यांच्या खात्यावर जमा केले असून वित्तीय लाभ शिक्षकांच्या बँक खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया जिल्हा भरामध्ये सुरु झालेली आहे. विशेषत: बीड तालुका पेन्शनसाठी घेणाऱ्या सेवानिवृत्त शिक्षकांची संख्या जिल्हयात सर्वात जास्त आहे. तरी सुध्दा सर्वात अगोदर अंशराशीकरण व उपदान रक्कम शिक्षकांच्या नावे जमा करण्यामध्ये बीड तालुक्याचे गटविकास अधिकारी मा.अनिरुध्द सानप, सहाय्यक लेखाधिकारी सरवदे आर.बी., पेन्शन सेक्शनचे संबंधीत कनिष्ठ सहाय्यक आनंद सानप यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विशेषत: आनंद सानप यांनी विनाविलंब वित्त तरतुद प्राप्त होताच तात्काळ सेवानिवृत्तांचे लाभ बँक खात्यावर जमा केले. संपूर्ण प्रक्रियेमध्ये कुठेही अर्थकरण झाले नाही. जिल्हयातील सर्वच गट विकास अधिकारी व त्यांच्या सहकार्यांनी प्राधान्याने शिक्षकांचें निवृत्ती विषयकचे लाभ जमा केले. आणि सेवानिवृत्त शिक्षकांना दिलासा दिल्यामुळे प्रशासनाचे अभिनंदन राज्य अध्यक्ष अनिल जाधवर, राज्य पदाधिकारी सुभाष जगताप, रविंद्र सुतार, अभिजित तांदळे, प्रकाश अहिरे, भगीरथ मस्के, बाळासाहेब सिरसाट, मुसा शेख, मच्छिंद्र राख, अर्जुन बारगजे, विभागीय पदाधिकारी पदमनाथ गर्जे, डी.एस.वाघमारे, भागवत सोनवणे, बाळासाहेब अहिरे, द.ल.वारे, विनायक किर्तने, जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब हंगे, जिल्हा पदाधिकारी राहुल सुपेकर, स्वामी ढोकणे, संजय दराडे, हकीम मनियार, प्रविण सानप, सुर्यकांत शिंदे, अनिल गोल्हार, मच्छिंद्रनाथ जगताप, विष्णूपंत मिसाळ, संतोष रणदिवे, परमेश्वर हंगे, तसेच सेवानिवृत्त लढा समितीचे पदाधिकारी, सुधाकर सावंत, सय्यद खतीब, राजेंद्र खेडकर, बाबुराव नागरगोजे इत्यादींनी अभिनंदन केले. असे राज्य अध्यक्ष अनिल जाधवर हे कळवतात.

### देशभरात आज पासून ...

नाही कोणत्याही सरकारी किंवा खाजगी संस्थेला ही माहिती दिली जात नाही फक्त आकडेवारीच वापरता येते असे जनगणना आयुक्त नारायण यांनी स्पष्ट केले जनगणनेसाठी कोणतीही कागदपत्रे वा पुरावे गरजेचे नाहीत नागरिकांनी जशी माहिती दिली तशी स्वघोषणानुसार नोंदवली जाईल पहिल्या टप्प्यासाठी ३३ प्रश्न निश्चित केले आहेत उदाहरणार्थ घराचा प्रकार व स्थिती, बांधकामसाहित्य, कुटुंबातील सदस्य संख्या, सुविधा व मालमत्ता, वाहनाची माहिती इत्यादी पहिल्या टप्प्यात घर यादी व ग्रहगणना होईल ०१ एप्रिल पासून नोंदणी सुरू होईल १६ एप्रिल पासून घराघरात जाऊन माहितीचे संकलन केले जाईल यामध्ये घराची स्थिती पाणी, वीज, स्वच्छतागृह, यासारख्या सुविधा घरातील मालमत्ता यांची माहिती गोळा केली जाईल. दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना होईल लोकांची सविस्तर माहिती घेतली जाईल वय शिक्षण व्यवसाय स्थलांतर इत्यादी बाबी नोंदवल्या जातील. ही जनगणना पहिल्यांदाच डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे प्रथमच नागरिकांना ऑनलाइन माहिती देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल मोबाईल पद्वारे माहिती संकलन, वेब पोर्टल द्वारे नियंत्रण, डिजिटल डेटा थेट उपलब्ध, ही याची मुख्य वैशिष्ट्ये असतील डिजिटल जनगणनेमुळे २०२७ मध्येच जनगणने संदर्भातील काही आकडेवारी प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे तरी देशातील राज्यातील जिल्ह्यातील तालुक्यातील गावातील जनतेने जनगणनेसाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना सहकार्य करावे व सत्य माहिती सादर करावी असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

### एसआयआर मॅपिंगसाठी ...

काही प्रमाणात पिळवणुकीच्या तक्रारी देखील पुढे येत आहेत. तसेच एसआयआर मॅपिंगसाठी नियुक्त करण्यात आलेले बीएलओ हे बहुतांश शिक्षक असून सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असल्यामुळे या प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. याचबरोबर अनेक गोरगरीब व सर्वसामान्य नागरिक रोजगाराच्या निमित्ताने देश-विदेशात स्थलांतरित झालेले आहेत. आर्थिक अडचणींमुळे त्यांना गावात येऊन एसआयआर मॅपिंग पूर्ण करणे शक्य होत नाही, परिणामी ते या प्रक्रियेतून वंचित राहत आहेत. वरील सर्व बाबींचा विचार करता, बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध भागांतून एसआयआर मॅपिंगसाठी दिलेल्या वेळेला मुदत वाढ देण्यात यावी अशी मागणी समाजवादी पक्षाचे माजलगाव तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्धीकी यांनी केली आहे.

### शिवाजी महाराज ...

अत्यंत संथ गतीने सुरू असून दर्जाबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. रस्त्यावर माती टाकून बोगस काम करू नये, त्याऐवजी योग्य प्रकारे मुरूम टाकून मजबूत बांधकाम करावे. तसेच रस्त्यावर पाणी मारून बुलडोझरच्या साहाय्याने योग्य दाब देण्यात यावा, जेणेकरून रस्ता टिकाऊ होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### भाजपच्या पाटोदा ...

यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष भागवत येवले यांच्या मान्यतेने करण्यात आली. हनुमान शेलार हे पाटोदा तालुक्यातील निरगुडी गावचे माजी सरपंच असून, त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करताना विकासाभिमुख भूमिका घेतली आहे. त्यांच्या कार्याचा व संघटनात्मक बांधिलकीचा विचार करून पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. या निवडीमुळे पक्ष अधिक मजबूत होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तसेच, आमदार सुरेश धस यांच्यासह अनेकांनी शेलार यांचे अभिनंदन केले आहे.

### पंडित दीनदयाळ उपाध्याय ...

पदाधिकारी:– उपाध्यक्ष – सुखदेव दगडू खाकाळ, उध्दव सदाशिव गर्जे, जयसिंग ईश्वर गव्हाणे, रेश्मा आजिनाथ शेळके, सविता रघुनाथ घुले, विकास रतन क्षिरसागर, सरचिटणीस – रमेश दिनकर तांदळे, राजेंद्र निवृत्ती गावडे चिटणीस – प्रतिभा मल्हारी शिंदे, दत्तात्रय गणपत वाडेकर, तेजस्वीनी सचिन दळवी, प्रतिभा बाळासाहेब थोरवे, सुनिता हनुमंत अडागळे, गणपत निवृत्ती अस्वर, कोषाध्यक्ष – निळकंठ गोपाळराव रक्टाटेआष्टी मंडळातील नवनियुक्त पदाधिकारी:– उपाध्यक्ष – ॲड. बाळासाहेब महादेव झांबरे, सुंदरलाल बाबुराव गर्जे, सुरेखा गोवर्धन तळेकर, बबनराव रामराव करांडे, पोपट भाऊसाहेब धुमाळ, भगवान पाटीबुवा सांगळे सरचिटणीस – सिंधु लालासाहेब शिंदे, शालन अशोक मुळे, चिटणीस – गुलाब उमर 'सय्यद पटेल, छाया संजय पवार, रुपाली बाळासाहेब पवार, माणीक नागनाथ दहिफळे, सादीक अब्दुलगणी कुरेशी, निळकंठ निवृत्ती खेडकर कोषाध्यक्ष – विष्णु मच्छिंद्र खाडे नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे आमदार सुरेश धस यांनी अभिनंदन करत, पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवून संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारीने काम करावे, असे आवाहन केले.

### जिल्ह्यातील तहसील ...

देण्यात आला आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व सामान्य नागरिकांनी नव्या स्वरूपात मिसळणारे प्रमाणपत्र काढून घ्यावे असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे पत्रात पुढे म्हटले आहे की नव्या स्वरूपात मिसळणारे प्रमाणपत्र पडताळणीसाठी बारकोड, डिजिटल नंबर असे दोन पर्याय असतील. गुगलवर किंवा कोणत्याही स्कॅनर ॲपवर कोड स्कॅन केला की प्रमाणपत्र कोणाच्या नावावर आहे, ते अधिकृत आहे की नाही, ही माहिती एका सेकंदात मिळणार आहे. जुन्या पद्धतीचा फायदा घेऊन बनावट शिक्के, सह्या करून बोगस दाखले तयार होत होते. आता फोटो, स्कॅनरमुळे फेरफाराला वाव राहणार नाही. शिक्षण, नोकरी, सरकारी योजनांसाठी लागणारी कागदपत्रे डिजिटल स्वरूपात व्हेरिफाईड राहणार आहेत. या बदलामुळे पारदर्शकता वाढणार आहे. सर्वसामान्यांची फसवणूक थांबण्यास मदत होणार आहे.तसेच प्रमाणपत्राच्या नमुन्यामध्ये देखील थोडा बदल करण्यात आला आहे, जसे की, पूर्वी ठट कोड व अर्जदाराचा फोटो प्रमाणपत्रावर दिसत नसे तो आता ऋझठ अंतर्गत प्रमाणपत्रामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. पत्रात शेवटी म्हटले की बीड जिल्ह्यातील नागरिकांना कोणत्याही प्रकारचे दाखले लागणार असल्यास त्यांनी वरील प्रमाणे फोटो हा देणे बंधनकारक आहे त्याशिवाय सदर दाखले दिले जाणार नाहीत यासाठी नागरिकांनी दक्षता घ्यावी व प्रशासकीय यंत्रणेला सहकार्य करावे असे आवाहन जे.डी.शाह यांनी केले आहे.

### द रीयल पँथर प्रेम...

प्रेम कांबळे हे सामाजिक क्षेत्रात सक्रिय कार्यकर्ते असून त्यांनी विविध प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत समाजातील वंचित, शोषित घटकांसाठी सातत्याने आवाज उठवला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे बीड जिल्ह्यात दलित पँथर संघटनेला अधिक बळ मिळणार असून युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. तसेच, अन्यायाविरोधात लढा देत समाजहिताच्या प्रश्नांवर तीव्रपणे काम करण्याची भूमिका संघटनेने स्पष्ट केली आहे.नियुक्तीनंतर प्रेम कांबळे यांनी संघटनेच्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करत, दलित पँथरच्या विचारांशी प्रामाणिक राहून अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि युवकांना संघटित करण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असे सांगितले.या निवडीबद्दल विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी प्रेम कांबळे यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.५४५/२०२५**
**बिभीषन मानीकराव हावळे विरुध्द ग्रा.पं.कार्या.मुर्शदपूर (घाट)पोथरा**

पहा

**१. बिभीषन मानीकराव हावळे, रा.मोमीनपुरा,बीड ता.जि.बीड** उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञमार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **कृष्णा बिभीषण हावळे** यांचा **दि.३०–०८–२००२** रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **मुर्शदपूर (घाट)पोथरा ता.बीड** येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालय **मुर्शदपूर (घाट)पोथरा ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१.०४.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख ०१.०५.२०२६ ही आहे.

**तहसिलदार, बीड**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २०९/२०२६**
**आदिका भ्र. नरहरी डोंबाळे व इतर वि. निरंक**
**(मार्फत – ॲड.ए.एच.ढेंगळे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे नरहरी पि.रंगनाथ डोंबाळे, रा.ईटकुर ता.गेवराई जि.बीड हे/हया दिनांक १८/०७/२०२५ रोजी वेदांत मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल जी.पी. ८३ रोटरी क्लब संभाजीनगर एम.आय.डी.सी. पु–पिंपरीचिंचवड हावेली पुणे येथे मयत झाले/झाल्या आहेत, अर्जदार क्र.१ आदिका भ्र.नरहरी डोंबाळे, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा.ईटकुर ता.गेवराई जि.बीड, अर्जदार क्र.२ सुनिता भ्र.संतोष शीराम, वय ४३ वर्षे, रा.ईटकुर ता.गेवराई जि.बीड, अर्जदार क्र.३ राम पि.नरहरी डोंबाळे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा.ईटकुर ता.गेवराई जि.बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे नरहरी पि.रंगनाथ डोंबळे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २७/०३/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०६/०५/२०२६.

क.लिपीक — कोर्टाचा शिक्का — आदेशावरुन सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.व्ही.सी.जोशी,९ वे सह दिवाणी न्यायाधीश,**
**व.स्तर,बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५०३/२०२६,**
**ॲड.एस.बी.शेख यांच्यामार्फत**
**तुकाराम पि.सखाराम मुंडे वि.निरंक**

ज्यापेक्षा भागाबाई भ्र.सखाराम मुंडे हया दिनांक २४.०४.२०२५ रोजी ताडसोन्ना,ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत आणि तसेच अर्जदार
१.तुकाराम पि.सखाराम मुंडे,वय–५२ वर्षे,धंदा–मजुरी,रा. ताडसोन्ना,ता.जि.बीड
२.गंगुबाई पि.पांडुरंग घुगे,वय–६६ वर्षे,धंदा–घरकाम,रा.बोरफडी, ता.जि.बीड
३.सखाराम पि.गिना मुंडे,वय–७७ वर्षे,धंदा–शेती,रा.ताडसोन्ना, ता.जि.बीड

अर्जदार क्रं.१ हा मयत नामे भागाबाई भ्र.सखाराम मुंडे यांचा मुलगा आहे तर अर्जदार क्रं.२ ही मयताची विवाहीत मुलगी आहे व अर्जदार क्रं.३ हे मयताचे पती आहेत.या अर्जदारां व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे.वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत,त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात,आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की,जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट,सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास,त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत भागाबाई भ्र. सखाराम मुंडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०५/०५/२०२६ आहे.

आज दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

क.लिपीक — कोर्टाचा शिक्का — आदेशावरुन अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.६५६/२०२६**
**सखाराम धोंडिबा बोरवडे विरुध्द ग्रा.पं.कार्या.भारसांगवी**

पहा

**१.सखाराम धोंडिबा बोरवडे, रा.भारसांगवी ता.जि.बीड** उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञमार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **अर्मिला सखाराम बोरवडे** यांचा **दि.२०–०६–१९८५** रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **भारसांगवी ता.बीड** येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालय **भारसांगवी ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०.०३.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २१.०४.२०२६ ही आहे.

**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.६५५/२०२६**
**किरण उध्दव नाईकवाडे विरुध्द ग्रा.पं.कार्या.समनापुर**

पहा

**१. किरण उध्दव नाईकवाडे, रा.समनापुर ता.जि.बीड** उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञमार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **किरण उध्दव नाईकवाडे** यांचा **दि.०२–०१–१९९४** रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **समनापुर ता.बीड** येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालय **समनापुर ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०.०३.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २१.०४.२०२६ ही आहे.

**तहसिलदार, बीड**